**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,**

**व**

## बी.एस.एस.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी.

**ता. लोहारा जि. उस्मानाबाद.**

**यांच्या संयूक्त विद्यमाने**

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम

## (सन 2018-19)

# वार्षिक अहवाल

बी. एस. एस. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शैक्षणिक वर्ष 2018-19 साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने एकूण 3 युनिट मंजूर केले असून **नियमीत कार्यक्रमासाठी 300 स्वयंसेवक कार्यरत** आहेत व **विशेष शिबीरासाठी 150** रासेयो स्वयंसेवकांची मंजूरी आहे. या तीन युनिटसाठी प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे यांनी रासेयो कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. के. ए. लोमटे, डॉ. एस. इ. मुंडे आणि श्रीमती प्रा. डॉ. पी. एल. सावंत यांची नियूक्ती केली. रासेयो नियमीत कार्यक्रमात सहभागी असलेल्या प्रत्येक स्वयंसेवकांना शैक्षणिक वर्षात 120 तास श्रमदानाचे काम महाविद्यालय परिसरात किंवा महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या ग्रामीण भागात करणे आवश्यक असते. त्यानुसार या

कार्यक्रमांतर्गत जलसंवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यावरण संवर्धन, एच.आय.व्ही. एड्स प्रतिबंध मार्गदर्शन, मोफत रक्तगट तपासणी, स्त्रियांमधील हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासणे व त्यावर उपाययोजना करणे, रक्तदान शिबीर. वृक्षारोपण, ग्रामसफाई, शोषखड्डे, राष्ट्रीय एकात्मता, महाविद्यालय परिसर स्वच्छता, सांस्कृतीक कार्यक्रम, जयंती उत्सव, श्रध्दांजली कार्यक्रम इत्यादी समाज जीवनाशी निगडीत कार्यक्षेत्रात कार्य करण्यात येते. आमच्या महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा **नियमीत कार्यक्रम** (सन 2018-19) **वार्षीक अहवाल** पुढील प्रमाणे सादर करीत आहोतः

दिनांक 15 जून 2018 ते 30 जूलै 2018 या कालावधीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना **स्वयंसेवकांची नोंदणी** केली व नोंदणी झालेल्या 300 स्वयंसेवकाची यादी व प्रत्येक स्वयंसेवकास 10 रुपये प्रमाणे 3000 रुपयांचा डी. डी. विद्यापीठाकडे पाठविण्यात आला. त्याच बरोबर **आपत्ती व्यवस्थापन** कार्यक्रमाअंतर्गत 30 रासेयो स्वयंसेवकाची यादी व **रेड रिबन क्लब** च्या निवडक 30 स्वयंसेवकाची यादी त्यांच्या मोबाइल क्रमांकासोबत विद्यापीठाकडे पाठविण्यात आली.

दिनांक 20 जून 2018 रोजी **कॉलेज–नॉलेज–व्हिलेजच्या** एकदिवशीय कार्यशाळेस रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण लोमटे हे औरंगाबाद येथे उपस्थित होते.

दिनांक 21 जून 2018 रोजी महाविद्यालयात **जागतिक योग दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, रासेयो कार्यक्रमाधिकारी व रोसेयो स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

दिनांक 01 जुलै 2018 रोजी महाविद्यालयात 150 वेगवेगळया प्रकारच्या **वृक्षांचे रोपण** करण्यात आले. या कार्यकमासाठी माकणी गावचे सरपंच, उपसरपंच व गावातील प्रतिष्ठित नागरिक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

दिनांक 22 जुलै 2018 रोजी महाविद्यालयात रासेयोचे एक दिवशीय शिबीर घेण्यात आले. या कार्यकमासाठी रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

दिनांक 01 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयात **लोकमान्य टिळकांची पूण्यतिथी** व अण्णाभाउ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यकमासाठी रासेयो स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

दिनांक 08 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयातील 85 रासेयो स्वयंसेवकांची **एच.आय.व्ही.एड्स चाचणी** घेण्यात आली. यासाठी स्पर्श ग्रामीण रुग्णालय सास्तूर च्या सहकार्याने एच.आय.व्ही. एड्स विषयी एकदिवशीय मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला.

दिनांक 15 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयात **स्वातंत्र्य दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानंतर वृक्षारोपण या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 19 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालय व स्पर्श ग्रामिण रूग्णालय सास्तूर यांच्या संयुक्त विद्यमाने **मॅरेथॉन व वक्तृत्व स्पर्धा** घेण्यात आल्या. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे सरांनी व स्पर्श येथील डॉ. रमाकांत जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दिनांक 20 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयात **सदभावना दिन** साजरा करण्यात आला. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दिनांक 23 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा **विद्यापीठ वर्धापन दिन** विद्यापीठाचा ध्वज फडकावून साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजीत केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते मा. प्रा. डॉ. के. आर. सुरवसे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे सर उपस्थित होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 28 ऑगस्ट 2018 रोजी महाविद्यालयात **केरळ महाप्रलय नागरी सहाय्य निधी** संकलन रॅली काढण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे मोठया संख्येने उपस्थित होते. सर्वांनी संपूर्ण माकणी गावामध्ये व्यापारी आणि सामान्य नागरीकांकडून एकूण 11001/- रूपयांचे संकलन करून सदरील रक्कम केरळ सरकारकडे पाठविण्यात आली.

दिनांक 05 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **शिक्षक दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमीत्त महाविद्यालयात नव्याने रुजु झालेल्या प्राध्यापकांचे व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे तसेच बी. ए./ बी. एस्सी./ बी. कॉम. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे सर उपस्थित होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 14 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **हिंदी दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्या डॉ. मीना जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हिंदी ही राजभाषा असून त्याचा वापर हा सर्वस्तरांतून झाला पाहिजे असे नमुद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे मोठया संख्येने उपस्थित होते.

दिनांक 17 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन** साजरा करण्यात आला. यामध्ये ध्वजारोहणाच्या सोहळयानंतर स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांचा सत्कार श्रीफळ देउन करण्यात आला. यानंतर व्याख्यानाचा कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. के. ए. लोमटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक प्रा. डॉ. बी. जी. माने यांनी तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. एस. इ. मुंडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. श्रीमती पी. एल. सावंत यांनी केले. कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 24 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **राष्ट्रीय सेवा योजना दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण लोमटे यांनी रासेयो स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्देश सांगून त्याचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तावीक डॉ. एस. इ. मुंडे यांनी तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. श्रीमती पी. एल. सावंत यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. ए. पी. बिराजदार यांनी केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 29 सप्टेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **सर्जिकल स्ट्राइक** दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दिनांक 30 सप्टेंबर 2018 रोजी सास्तूर व किल्लारी परिसरातील 30 सप्टेंबर 1993 च्या प्रलंयकारी **भूकंपात मरण पावलेल्या मृतःत्म्यास भावपूर्ण श्रध्दांजली** अर्पण करण्यासाठी सास्तूरच्या चौकामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सास्तूर व परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने घेतलेल्या या रासेयो कार्यक्रमात 300 नागरिक व 60 स्वयंसेवकांनी

उस्फुर्त सहभाग नोंदविला. याठिकाणी ज्ञानेश्वर माऊली महाराज माकणीकर व उस्मानाबादचे विद्यमान खासदार मा. रवी गायकवाड, उमरगा लोहारा तालूक्याचे विद्यमान आमदार मा. ज्ञानराज चौगूले उपस्थित होते. सास्तूरचे नागरिक व महाविद्यालय यांच्यातर्फे सर्वांना खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण लोमटे प्रा. डॉ. एस. इ. मुंडे, प्रा. डॉ. श्रीमती पी. एल. सावंत व प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे यांचा मोलाचा वाटा आहे.

दिनांक 02 ऑक्टोबर 2018 रोजी महाविद्यालयात **राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची 150 वी जयंती जागतीक अहिंसा दिन** म्हणून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. काकासाहेब सुरवसे यांनी महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान हे आजच्या पिढीसाठी कसे महत्वपूर्ण आहे हे पटवून दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण लोमटे यांनी केले तर आभार डॉ. एस. इ. मुंडे यांनी मानले. कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 03 आक्टोबर 2018 रोजी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. के. ए. लोमटे हे रासेयो **एकदिवशीय कार्यशाळेस** व्यंकटेश महाजन महाविद्यालय उस्मानाबाद येथे उपस्थित होते.

दिनांक 05 आक्टोबर 2018 रोजी महाविद्यालयात **मतदार नोंदणी अभियान** राबविण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दिनांक 05 आक्टोबर 2018 रोजी महाविद्यालयास **उन्नत भारत अभियान** राबविण्यास शासकिय संमती मिळाली. यासाठी महाविद्यालयाने 5 गावे निवडली व त्या पाच गावांचे सर्वेक्षण व कुटूंबाचे सर्वेक्षण करण्याचे काम सुरू केले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांचे मोठया प्रमाणात सहकार्य लाभले.

दिनांक 12 आक्टोबर 2018 रोजी महाविद्यालयात **आरोग्य चिकित्सा शिबीर** व **रक्तदान शिबीराचे** आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील 450 विद्यार्थ्यांनी या शिबीराचा लाभ घेतला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

दिनांक 15 आक्टोबर 2018 रोजी महाविद्यालयात **वाचन प्रेरणा दिन** साजरा करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एस. इ. मुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. तर सुत्रसंचलन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. के. ए. लोमटे यांनी केले. या कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 28 नोव्हेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **महात्मा फुले जयंती** साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. एच. एन. रेडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 01 डिसेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **जागतीक एड्स दिन** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रॅली काढून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून स्पर्श ग्रामीण रुग्णालय, सास्तूर येथील श्रीमती पवार दिपा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 06 डिसेंबर 2018 रोजी महाविद्यालयात **महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. के. आर. सुरवसे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण लोमटे यांनी केले

तर आभार डॉ. एस. इ. मुंडे यांनी मानले. या कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 14 ते 20 डिसेंबर 2018 दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेचे शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील **विशेष शिबीर मौजे- उदतपूर** ता. लोहारा येथे संपन्न झाले. यामध्ये जलसंवर्धनासाठी रासेयो स्वयंसेवकांना रोपे लावणे, रोपांना आळे करणे, वृक्षांना पाणी घालणे, सफाई, स्वच्छता, गटारी, नाल्या साफ करणे, सार्वजनीक ठिकाणची साफसफाई, मंदीर परीसर सफाई, रस्तेबांधणी, मूरूम पसरवणे, रस्त्यावरील खड्डे बूजवणे इ. सामाजीक कार्याच्या माध्यमातून रासेयो स्वयंसेवकांना श्रमसंस्कार व श्रमप्रतिष्ठा याचे व्यक्तीगत व समाजीक जीवनातील महत्त्व पटवून देण्यात आले. ग्रामस्वच्छतेच्या कार्यामध्ये ग्रामस्थानी मोलाचे सहकार्य केले. तसेच शिबीरामध्ये व्यक्तीमत्व विकासासाठी प्राणायम, योगासने, विविध क्षेत्रातील तज्ञांचे बौध्दिक व्याख्याने आयोजीत केली होती. तसेच पशुचिकीत्सा, महिला मेळावा, आरोग्य तपासणी, स्त्रियांमधिल हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासून योग्य सल्ला देणे, अंधश्रध्दा निर्मुलन, पाणी व्यवस्थापन इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. शिबीर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिका-यांनी विशेष परिश्रम घेतले.

दिनांक 12 जानेवारी 2019 रोजी महाविद्यालयात **स्वामी विवेकानंद जयंती** ही युवा दिन म्हणून साजरी करण्यात आली. तसेच **राजमाता जिजाऊ जयंती** साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयालयातील प्रा. डॉ. के. आर. सुरवसे यांनी आधुनिक काळात तरूणांची कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक 14 जानेवारी 2019 रोजी महाविद्यालयात **विद्यापीठ नामविस्तार दिन** साजरा करण्यात आला. या निमीत्त महाविद्यालयात काव्यवाचनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते व सुप्रसिध्द कवी म्हणून प्रा. एस.एल. राठोड यांनी नामविस्तार दिनाचे

महत्व सांगितले व आपल्या कविता वाचून दाखवल्या. तसेच नवोदित कवी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनीही आपल्या कविता वाचून दाखवल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे उपस्थित होते.

दिनांक 25 जानेवारी 2019 रोजी महाविद्यालयात **राष्ट्रीय मतदार दिन** साजरा करण्यात आला. या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे होते. प्रमुख वक्ते डॉ. एस. इ. मुंडे यांनी मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किरण लोमटे यांनी केले तर आभार डॉ. के. आर. सुरवसे यांनी मानले.

दिनांक 26 जानेवारी ते 10 फेब्रुवारी 2019 या कालावधीत महाविद्यालयात **लोकशाही पंधरवाडा** साजरा करण्यात आला. यामध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम, व्हीपॅट मशिन संदर्भात माहिती इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक 19 फेब्रुवारी 2019 रोजी महाविद्यालयात **शिवजयंती कार्यक्रम** उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. बी. जी. माने यांचे व्याख्यान आयोजीत केले होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. इ. मुंडे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किरण लोमटे यांनी केले तर आभार डॉ. के. आर. सुरवसे यांनी मानले.

दिनांक 23-24 फेब्रुवारी 2019 रोजी महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किरण लोमटे हे बालेवाडी पूणे येथे मा. ना. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या दोन दिवशीय कार्यशाळेस उपस्थित होते.

दिनांक 27 फेब्रुवारी 2019 रोजी महाविद्यालयात **मराठी भाषा गौरव दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय लोहारा येथील प्रा. रामहारी सुर्यवंशी हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. इ. मुंडे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. के. आर. सुरवसे यांनी केले तर आभार प्रा. किरण लोमटे यांनी मानले.

एकूणच राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमीत कार्यक्रम महाविद्यालयात घेतले जातात. यामध्ये रासेयो स्वयंसेवकांमध्ये नेतृत्व गूण व व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा, आरोग्य तपासणी शिबीर, स्वच्छता अभियान, रक्तदान, एच. आय. व्ही. एड्स तपासणी, वृक्षारोपण करणे, राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना कार्यक्रम, लैंगिक समानता व महिला सक्षमीकरण, वर्षभरातील महात्वाच्या दिवसांचे कार्यक्रम महाविद्यालयात घेतले जातात. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एन. रेडे  यांचे पाठबळ आणि मार्गदर्शन लाभते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे योगदान असल्यामुळे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमीत कार्यक्रम यशस्वीपणे साजरे होण्यास मदत होते. एकूणच राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व अनन्यसाधारण आहे.

रासेयो कार्यक्रमाधिकारी                                        प्राचार्य